Aarhat Multidisciplinary International Education Research Journal (AMIERJ)
( UGC Approved Journal No 48178, 48818 )
ISSN 2278-5655

# शाहू महाराजांच्या जातिभेद निर्मूलनाच्या प्रश्नाचे अध्ययन

**प्रा.डॉ. नारायण पोहकर**
(राज्यषास्त्र विभाग)
नागनाथ महाविद्यालय,
औंढा नागनाथ

**प्रस्तावना:**

शाहू महाराजांनी आपल्या राजपदाचा उपयोग बहुजनाच्या कल्याणासाठी केला. त्यांनी आपण सारे एकाच राष्ट्राचे घटकावयव आहात असा विचार मांडून संस्थानात राष्ट्रीय एकात्मता निर्माण केली. सर्व जाती धर्म आपण वेगळे नसून आपल्याला आपल्या राष्ट्रासाठी काम करावयाचे आहे असा संदेश त्यांनी दिला. या त्यांच्या विचारातून त्यांनी समाजातील सर्व पददलितांना आपले मानले होते हे स्पष्ट होते. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून बहुजनाला शिक्षित करून त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. समाजातील जात–धर्म सार्वजनिक कार्यात आड येता कामा नये. म्हणून जातीव्यवस्थेचे निर्मूलन केले. धर्मव्यवस्थेत बदल केले. समाजातील प्रश्नांचा विचार करून ते प्रश्न प्रत्यक्षात सोडवण्याचा प्रयत्न केला. संस्थानात सिंचन व्यवस्था करून हरितक्रांतीला गती दिली. शेतकऱ्यांचे प्रश्न शेतीला अल्पदराने भांडवल पुरवून सोडविले. समाजातील उपेक्षित समाजाला प्रशासनात आणि राजकारणात स्थान देवून त्यांचा सन्मान केला. स्त्रियांना शिक्षण देवून आणि समाजातील अनिष्ठ प्रथांना विरोध करून स्वातत्र्य दिले. संस्थानात सहकाराला आणि व्यापार वाढीला गती दिली. जुने मूल्य विचार यामध्ये बदल करून आधुनिक विचाराचा पाया शाहू महाराजांनी घातला. त्यांनी ताठर कायदे करून कायदे मोडणाऱ्याला शिक्षेचा धाक दाखविला. जीवसृष्टीचा एक अत्यंत महत्वाचा भाग म्हणून जंगल संवर्धनाचा कायदा केला. एकूणच संस्थानात लोकशाहीला पोषक वातावरण निर्माण केले. स्वातंत्र्य, समानता, न्याय आणि बंधुता ही मुख्य विचारधारा शाहू महाराजांच्या विचाराची मध्यभागी संकल्पना होती. त्यामुळे त्यांचे विचार त्यावेळी फायद्याचे होते आणि आजही उपयुक्त

आहेत. यानंतरही ते फायद्याचे आणि भावी पिढीला दिशा देणारे, मार्गदर्शन करणारे आहेत.

**गृहितके:**

1) धर्म संस्थेतील मक्तेदारी कमी करण्यासाठी शाहू महाराजांचे जातीभेद निर्मूलन हितकारी आहे.

2) शाहू महाराजाच्या जातिभेद निर्मूलन विचारामुळे समाजातील जातीय दरी कमी झाली आहे.

**ब्रिटिश भारतातील सामाजिक स्थिती:**

.भारतात व महाराष्ट्रात ब्रिटीशांची सत्ता सुमारे 150 वर्षे होती. 20 व्या शतकाच्या पुर्वाधाच्या कालखंडात प्रबोधनामुळे स्वातंत्र्य चळवळीचे मूळ येथील समाजात रूजण्यास सुरूवात झाली. 1920 नंतर ब्रिटीशांच्या अन्यायी प्रवृत्तीचे आकलन होण्यास सुरूवात झाली. 19 व्या शतकातील ब्रिटीश राजसत्तेचे स्वरूप थोडे वेगळे होते. इंग्रजांना सुरूवातीला भारतीय प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापित करावयाचे होते. यासाठी त्यांनी वेगवेगळया योजना, धोरणे व विभिन्न मार्गाचा अवलंब केला. भारतातील सत्ताधीशांमधील संघष, एकतेचा अभाव, घरभेदीपणाची प्रवृत्ती, राजकीय अकार्यक्षमता व सामाजिक अशांतता ब्रिटीशांना राज्य करण्यासाठी उपयुक्त ठरली आणि ब्रिटीशांनी आपल्या सत्तेचा विस्तार करणे शक्य झाले. समाजातील स्थितीचा विचार केला असता असे दिसून येते की, समाजात श्रेष्ठ कनिष्ठ जातीयता निमाण झाली होती. समाज देव, देवता नवस यांच्या खाली दबला गेला होता. देव आणि सामान्य माणूस यामध्ये पुजारी दलालाचे काम करत होते. पुजारी जे म्हणतील ती पूर्व दिशा असे. समाजव्यवस्थेतील 80 टक्के समाज आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेला होता. समाजातील शिक्षणाचे प्रमाण 5 टक्के होते. त्यातही वरिष्ठ लोक शिक्षण घेत असत. 19 व्या शतकाच्या प्रारंभी सार्वभौम असणारे कोल्हापूर राज्य इंग्रजी साम्राज्य सत्तेच्या प्रभावाखाली जावून ब्रिटीशांचे एक मांडलीक राज्य बनले. शाहू पूर्वकालीन अर्धशतकाहून अधिक काळ कोल्हापूर संस्थानात अल्पवयीन राज्यांच्याच राजवटी निर्माण झाल्या होत्या. 2 एप्रील 1894 ला शाहू महाराजांचा राज्यरोहण कार्यक्रम पार पडला व कोल्हापूर संस्थानाला राजर्षी शाहू महाराजांच्या रूपाने स्थिर वारस म्हणून राजा मिळाला.

**जातिभेद निर्मूलन:**

शाहूकालीन समाज व्यवस्था जाती–उपजातींना बांधली गली होती. समाजनियम ताठर बनले होते. समाजात असलेल्या वरीष्ठ कनिष्ठ भावना तीव्र स्वरूपात निर्माण झाली होती. सर्वात कनिष्ठ असलेल्या दलितांची स्थिती अत्यंत वाईट होती. सामाजिक विकासाच्या दृष्टीने ही

स्थिती अत्यंत वाईट होती. शाहू महाराजांनी हे सर्वप्रथम ओळखून जातीय निर्मूलनाचे कार्य होती घेतले.

मानवतेच्या व सामाजिक समतेच्या दृष्टीने कलंक असलेली जातियता व अस्पृश्यता नष्ट केली. बहुजनांच्या उन्नतीकडे शाहू महाराजांनी विशेष लक्ष दिले. अस्पृश्यांची बुध्दीमता ही त्यांना अस्पृश्य मानणाऱ्या लोकांपेक्षा अधिक प्रखर असून त्यांच्यापेक्षा तुम्ही पराक्रमी, सुविचारी, स्वार्थ त्यागी, हिंदी राष्ट्राचे अभिन्न घटक आहात. म्हणून तुम्ही अस्पृश्य नाही अशी अस्पृश्यांप्रती शाहू महाराजांची स्वाभीमानी विचारधारणा निर्माण केली.

राजर्षी शाहू महाराज हे नुसतेच बोलघेवडे समाज सुधारक नव्हते तर अस्पृश्यता निवारणार्थ त्यांनी अनेक प्रत्यक्ष कृती कार्यक्रम हाती घेतले. अनेक मागासलेल्या घटकांच्या परिषदा भरवून जातीयता कमी केली.

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यता निर्मूलन व्हावे म्हणून महार वतने रद्द केली. मागासलेल्या वर्गांच्या शिक्षणाची सोय केली. गावच्या चावडीवरील अस्पृश्य लोकांची हजेरी बंद केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अस्पृश्यांचा नेता मिळाला म्हणून गौरव केला. एवढेच नव्हे तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोल्हापूरला गेले असता, कोल्हापूर सोडण्यापूर्वी आंबेडकरांना माझी विनंती की, त्यांनी रजपूतवाडी कॅम्पमध्ये मजबरोबर जेवावे याचा आग्रह शाहू महाराजांनी धरून अस्पृश्याबरोबर सहभोजन केले. डॉ. आंबेडकर राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्यांप्रती असलेले प्रेम, तळमळ आणि जिव्हाळा पाहून त्यांचा अस्पृश्यांचा सखा म्हणून उल्लेख करतात. ही शाहू महाराजांच्या अस्पृश्यता निर्मूलनविषयक विचारांची खूप मोठी साक्ष आहे. राजर्षी शाहू महाराज समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते. मानवतावाद हेच त्यांच्या विचारांचे ऊर्जाकेंद्र होते. या ऊर्जेतूनच त्यांचे अस्पृश्यता निर्मूलनविषयक विचार फुलून आलेले दिसतात. शाहू महाराजांनी आंतरजातीय विवाहाचे समर्थन केले. प्रत्यक्षात स्वतः मराठा धनगर विवाह घडून आणला. यावरून जातियता निर्मूलन व्हावे हा त्यांचा उद्देश होता.

अस्पृश्यांनी बाटविलेल्या विहीरीचे पाणी शाहू महाराज स्वतः पित असत. शाहू महाराजांनी गंगाराम कांबळे या एका अस्पृश्य व्यक्तीला चहाचे उपहारगृह टाकून दिले व शाहू महाराज त्या उपहारगहात स्वतः चहा फराळ त्या ठिकाणी घेत. शाहू महाराजांनी गणपत पवार व लक्ष्मण मास्तर यांना शिवण यंत्रे देऊन दरबारातील कपडे त्यांच्याकडे शिवण्यासाठी दिले

तसेच आपल्या मिरवणूकीच्या हत्तीचा माहुत अस्पृश्य नेमला. दरबाराच्या पंक्तीला महार, मांग, चांभार स्वतः सोबत जेवणासाठी बसवून अस्पृश्यता दूर केली. शाहू महाराजांनी स्वतःचे शरीर संरक्षक अस्पृश्य ठेवले होते. 1918 मध्ये शाहू महाराजांनी खास हुकुम काढून अस्पृश्य जातीच्या लोकांना तलाठी म्हणून नेमले. महार, मांग, चांभार व ढोर इत्यादी अस्पृश्य जातीतील चार लोकांची निवड करून त्यांच्या शिक्षणाची सोय केली. मंडपाळकर (महार), पवार डी.एस. (चांभार), गणाचार्य (मांग), आणि रामा करंडे (चांभार), यांना शिक्षण देवून वकीलाच्या सनदा दिल्या. समाजातील अस्पृश्य व्यक्तीला सवर्णाच्या वस्तीत घरे दिली. याचा उद्देश असा की, अस्पृश्य लोकांना आत्मविश्वास निर्माण करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करणे हा होता. यावरून शाहू महाराजांनी प्रत्यक्ष कृतीव्दारे जातीयता दूर केली. त्यांच्या पुरोगामी विचारामुळे सामाजिक अभिसरणाची प्रक्रिया आज वाढीला लागली आहे. आज समाजात अस्पृश्यता व जातीयता ताठर स्वरूपात राहिली नाही. वरिष्ठ वर्गीयांचे महत्व कमी झाले आहे.

**निष्कर्ष:**

1) शाहू महाराजांच्या विचारामुळे जातीयता कमी झाली. आज दलित समाज विकासाच्या मार्गावर आला आहे.

2) पूर्वीसारखे जातीचे ताठर बंधने आज राहिले नाही. सार्वजनिक हॉटेल मधून कनिष्ठ—वरिष्ठ एकत्र जेवण घेत आहेत.

3) प्रत्यक्षात पूर्ण जातीयता दूर झाली असे नाही. कनिष्ठ—वरिष्ठ जातीतील विवाह बंधने दूर झाली नाहीत.

4) शाहू महाराजांच्या विचारावर वर्तमान मंदीरातील पुजाऱ्यामध्ये बहुजन समाजाच्या पुजाऱ्यांचा भरणा झाला आहे. तुळजापूर पंढरपुर औंढा नागनाथ, परळी वैजनाथ या ठिकाणी बहुजन समाजाचे पुजारी प्रत्यक्षात पुजा, अभिषेक करत आहेत.

म्हणून शाहू महाराजांचे विचार पूर्वी महत्वाचे होते आजही महत्वाचे आहेत आणि येणाऱ्या काळातही महत्वाचे राहणार आहेत. त्यांचे विचार डोळसपणे स्विकारले तर समाजातील जातीयता निश्चित दूर झाल्याशिवाय राहणार नाही.

थोडक्यात राजर्षी शाहू महाराजांचे विचार समाजात सामाजिक श्रेष्ठ, कनिष्ठता दूर करणारे व समाजाला राष्ट्रीय एकात्मता निर्माण करणारे आहेत. त्यांच्या विचारामुळे सामाजातील जातियता कमी झाली आहे असे म्हणावे लागेल.

ISSN 2278-5655

## ग्रंथसूची

1) जाधव आर. 1997, लोकराजा, सुरेश एजन्सी पूणे.

2) लट्ठे ए.बी. 1994, द मेमाईर्स ऑफ हिज हॉयनेस, श्री शाहू छत्रपती ऑनर्स, कोल्हापूर.

3) कुलकर्णी ऐ. व खरे जी – 2006, मराठयांचा इतिहास, विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंळळ, पूणे.

4) कौंडेकर आर., 2001, रयतेचा राजा राजर्षी शाहू महाराज, अरूणा प्रकाशन लातूर.

5) पवार जे. 2001, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर.

6) मंगल के. टि. 2006, समाजशास्त्रज्ञ राजर्षी शाहू, जनराज ऑफसेट कोल्हापूर.

7) मोरे जी. 2009, राजर्षी शाहू विचार व कार्ये, निर्मीती विचार मंच, कोल्हापूर.

8) कडवे आर., 2004, लोकराजा शाहू छत्रपती, शेषी प्रकाशन, वर्धा.